दैनिक
# दिव्य मातृछाया
बुलडाणा
शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६
महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र
● वर्ष : पाचवे ● अंक : २६८ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711
www.matruchhaya.in
● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555

# नागरिक अस्वस्थ; इंधनांचा पुरेसा साठा : सरकारचा दावा

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक इंधन पुरवठ्यावर परिणाम झाला असला तरी, भारतात पेट्रोल, डिझेल, एलपीजी किंवा नैसर्गिक वायूचा कोणताही तुटवडा नाही, अशी स्पष्ट हमी पेट्रोलियम व नैसर्गिक वायूमंत्री हरदीप पुरी यांनी गुरुवारी लोकसभेत दिली. टंचाईच्या केवळ अफवा असल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र, महाराष्ट्रासह देशभरातील अनेक शहरांत गॅसटंचाईचे चटके बसतच असून सिलिंडर वितरणासाठी पोलीस बंदोबस्त ठेवावा लागत आहे. दुसरीकडे, गॅसअभावी छोटी उपाहारगृहे, खाणावळी बंद पडू लागल्याने त्यावर अवलंबून असलेल्या विद्यार्थी आणि श्रमिकवर्गाने गावाकडची वाट धरली आहे.

देशातील एलपीजी गॅसपुरवठ्यातील अडचणी आणि संभाव्य तुटवड्याच्या मुद्द्यावर गुरुवारी संसदेत गदारोळ झाला. विरोधी पक्षांच्या खासदारांनी सरकारवर निष्क्रियतेचा आरोप करत संसदेच्या आवारात आंदोलन केले आणि या विषयावर तातडीने चर्चा घेण्याची मागणी केली. देशात एलपीजीचा साठा किती आहे, पुरवठा कधी सुरळीत होणार आणि सरकार कोणती पावले उचलत आहे याबाबत माहिती देण्याची मागणी विरोधकांनी केली. त्यावर पेट्रोलियममंत्री हरदीप पुरी यांनी लोकसभेत निवेदन दिले.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे जगातील सुमारे प्रत्येकी २० टक्के कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि एलपीजी पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी जहाज वाहतूक बाधित झाली आहे. मात्र, भारताने पर्यायी स्रोतांमधून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात केले असल्याने देशाच्या गरजांपेक्षा जास्त पुरवठा उपलब्ध आहे, असे पुरी यांनी लोकसभेतील निवेदनाद्वारे स्पष्ट केले. जागतिक बाजारात एलपीजीच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या असल्या तरी भारतात ग्राहकांवर त्याचा पूर्ण भार टाकलेला नाही. सध्याच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत अफवा वा चुकीची माहिती पसरवण्याऐवजी सर्वांनी संयम राखणे गरजेचे आहे, असे आवाहन त्यांनी केले.

केंद्र सरकारच्या ग्वाहीनंतरही गॅस आणि इंधनटंचाईची भीती कायम आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगलीसह अनेक जिल्ह्यांमध्ये गॅस सिलिंडर मिळत नसल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी आहेत. हॉटेलांमधील गॅससाठा पुरवून वापरण्यासाठी काही खाद्यपदार्थांवर काट मारण्यात आली आहे.

युद्ध सुरूच राहिल्यास गॅस सिलिंडर मिळणार नाही, या भीतीने वितरकांच्या दुकानांबाहेर ग्राहकांच्या रांगा लागत आहेत तर, पेट्रोल पंपांवरही आता वाहनांच्या रांगा वाढल्याचे चित्र आहे.



### केंद्राचे म्हणणे...

- सध्या भारत ४० देशांमधून कच्चे तेल आयात करतो. देशातील रिफायनऱ्या पूर्ण क्षमतेने उत्पादन करत आहेत.
- घरगुती पाइप गॅस आणि वाहनांसाठी 'सीएनजी'चा १०० टक्के पुरवठा केला जात आहे. उद्योगांना सुमारे ८० टक्के आणि खत उद्योगाला ७० टक्के पुरवठा केला जाईल.
- अमेरिका, नॉर्वे, कॅनडा, अल्जीरिया आणि रशिया यांसारख्या देशांकडून एलपीजी खरेदी वाढवण्यात आली आहे. मागील पाच दिवसांत एलपीजी उत्पादनात २८ टक्के वाढ झाली आहे.

### स्पर्धा परीक्षार्थींची बांधाबांध

- व्यावसायिक सिलिंडर बंद झाल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये अनेक खानावळी बंद पडल्या आहेत. गुरुवारी रात्रीचे जेवण मिळणार नाही, असे काहींना कळवले आहे.
- काहींनी प्रतिमाह २०० रुपये भोजन शुल्क वाढविल्याने स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी शहरात राहणाऱ्या मुलांनी गावाकडे जाण्यासाठी बांधाबांध सुरू केली आहे. करोना काळात ज्याप्रमाणे विद्यार्थी गावाकडेच थांबले होते, तशीच अवस्था आता झाल्याची भावना काही परीक्षार्थींनी व्यक्त केली.

### लोखंडी सळ्यांच्या किमतीमध्ये वाढ

- युद्ध सुरू झाल्यापासून म्हणजे २८ फेब्रुवारी ते आजपर्यंत लोखंडी सळ्यांच्या दरात प्रति क्विंटल सहा हजार रुपयांची वाढ झाली आहे. गेल्या १२ दिवसांत प्रतिटन ५६ हजार रुपये असणारा दर आता ६१ हजार ५०० रुपयांवर गेला आहे. आखाती देशासह विविध ठिकाणातून आयात होणारे स्क्रॅप पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने अशी परिस्थिती उद्भवली असल्याचे जालना येथील स्टील उद्योजक डी. बी. सोनी यांनी सांगितले.

# सिंदखेडराजा नगरपरिषदेत कचरा गाड्यांचा बोजवारा; नागरिक त्रस्त – स्वच्छता मोहिमेवर प्रश्नचिन्ह

● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा :** शहरात नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबवली जात असली तरी प्रत्यक्षात मात्र कचरा संकलनाच्या गाड्या वेळेवर न आल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील अनेक भागात दररोज येणाऱ्या घनकचरा गाड्या उशिरा येतात किंवा काही वेळा येतच नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे घरातील कचरा टाकायचा कुठे असा प्रश्न नागरिकांसमोर उभा राहत असून अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढिग दिसून येत आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार शहरातील विविध भागात कचरा वेळेवर उचलला गेला नाही तर दुर्गंधी पसरून आरोग्याचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने या बाबीकडे तातडीने लक्ष देऊन कचरा संकलनाची व्यवस्था सुरळीत करावी तसेच ठेकेदारावर योग्य कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

याबाबत नगरपरिषद मुख्याधिकारी आशिष बोबडे यांनी लक्ष घालून शहरातील कचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.




- नागरिकांनी संबंधित ठेकेदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता अनेकदा फोन उचलला जात नसल्याचेही सांगितले जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुसरीकडे नगरपरिषदेकडून स्वच्छ शहर, सुंदर शहर अशा घोषणा देत स्वच्छता मोहिमा राबविल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात कचरा व्यवस्थापनात ढिसाळपणा दिसून येत असल्याने या मोहिमांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# सिं.राजा येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना सदस्य नोंदणी मोहीम सुरू




● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना संस्थापक राजसाहेब ठाकरे व अमितसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार सिंदखेडराजा येथील जिजामाता विद्यालय समोर सदस्य नोंदणी मोहीम सुरू झाली असून युवक-युवतींना मनसेत सामील होण्याची संधी दिली जात आहे.

या कार्यक्रमास मनसे जिल्हाध्यक्ष शिवादादा पुरंदरे, विधानसभा अध्यक्ष रोहीत शेळके, अजुन जाधव, युवा नेते, शहर अध्यक्ष रोहीत जाधव, प्रथमेश चव्हाण, रोशन चव्हाण यांसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. या सदस्य नोंदणी मोहिमेत तरुण-तरुणींमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला असून शहरातील विद्यार्थी वर्गानेही सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या मार्गदर्शनासाठी वरिष्ठ नेते उपस्थित होते आणि नोंदणी मोहिमेचा उद्देश तरुणांना राजकारणात सक्रिय करण्याचा आहे. सदस्य नोंदणी मोहीम पुढील काही दिवस सुरू राहणार आहे.

- कार्यक्रमामध्ये मनसेच्या ध्येय आणि उद्दिष्टांची माहिती दिली गेली असून सदस्यांना संघटनेशी निगडीत विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. सदस्य नोंदणीसाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली आणि महिलांचा देखील मोठा सहभाग होता. युवकांनी मनसेच्या सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आणि शहरातील विविध भागातून नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.

# औषध खरेदीत चार कोटींची अनियमितता, विरोधक आक्रमक, सभापतींचे चौकशीचे निर्देश

## नाशिक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात खरेदीत घोटाळा




● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** नाशिक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात औषध खरेदी प्रक्रियेत चार कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप विरोधकांनी विधान परिषदेत केला. अधिकाऱ्यांनी आक्षेप नोंदवल्यानंतरही एकाच कंपनीकडून औषधांची खरेदी करण्यात आली. यावर आरोग्य विभागाकडून समाधानकारक उत्तर न अल्याने चौकशीची मागणी करण्यात आली.

यावर सभापती राम शिंदे यांनी तातडीने चौकशीचे करण्याचे आदेश देतानाच वस्तुस्थिती सभागृहात मांडण्याचे आदेश दिले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात औषध खरेदीत मोठा भ्रष्टाचार सुरू आहे. नाशिकमध्ये सन २०२४–२५ या वर्षात औषध खरेदी प्रक्रियेत ४ कोटींची अनियमितता झाल्याचा मुद्दा आमदार पंकज भुजबळ आणि इद्रिस नायकवडी यांनी तारांकित प्रश्नाद्वारे मांडला. तत्कालीन अधिकाऱ्यांनी संबधित फाईलवर आक्षेप नोंदवला होता, तरीही एकाच कंपनीकडून बहुतांश औषधांची खरेदी करण्यात आली.

आमदार अनिल परब यांनी तीव्र नाराजी व्यक्त करताना, सरकार गंभीर नसल्याचा मुद्दा मांडला. तसेच तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. यावर सभापती राम शिंदे यांनी, सदस्यांना प्रश्नांची उत्तरे वेळेत न मिळणे ही गंभीर बाब असल्याचे नमूद करताना या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तूस्थिती सभागृहासमोर मांडली जाईल, असे स्पष्ट केले.

- तांत्रिक मान्यतेसाठी दिलेला निविदा क्रमांक आणि प्रत्यक्ष पुरवठा आदेशातील क्रमांकात मोठी तफावत आढळून आली.
- निविदेला अधिकृत प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वीच घाईघाईने खरेदी प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आरोप केला; परंतु सरकारने त्यावर लेखी उत्तर आले नसल्याचे छापील पुस्तकात नमूद केले. सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनी यावर शासनाच्या कारभारावर सडकून टीका केली.

# शिवसेना कुणाची? दोन्ही गट अंतिम युक्तिवादासाठी तयार, कोर्टाने दिली तारीख




● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये शिवसेनेतलं सर्वात मोठं बंड केलं. ४० आमदारांना घेऊन ते बाहेर पडले आणि थेट शिवसेना नेतृत्वाला म्हणजेच उद्धव ठाकरेंना आव्हान दिलं.

दोन्ही पक्षांचा वाद निवडणूक आयोगाच्या दारात गेला तेव्हा निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि पक्षचिन्ह असलेला धनुष्य-बाण हे दोन्ही एकनाथ शिंदेंना दिलं. एकनाथ शिंदे जून २०२२ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. आता ते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत. दरम्यान शिवसेना कुणाची हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहचला आहे. मागील तीन वर्षांपासून या प्रकरणी निर्णय आलेला नाही. आता दोन्ही गट अंतिम युक्तिवादासाठी तयार आहेत, मात्र कोर्टाने पुढची तारीख दिली आहे.

# राज्यात ३० लाख घरकुलांना मंजुरी!

## २ .१० लाख रुपये अनुदान कसे मिळणार? मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली माहिती

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राज्यात गतवर्षात ३० लाख घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी चार लाख घरे पूर्ण झाली आहेत, तर दहा लाख घरकुलांचे बांधकाम सुरू आहे. गत चौदा वर्षांत राज्यात एकूण २६ लाख घरकुले बांधली आहेत, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, प्रवीण दरेकर, भाई जगताप आदींनी या बाबत प्रश्न विचारला होता.

राज्यात गत काही महिन्यांत सुमारे ३० लाख घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी चार लाख घरांचे काम पूर्ण झाले आहे, तर दहा लाख घरकुलांना तिसरा हप्ता देण्यात आला असून, त्यांचे काम गतीने सुरू आहे.



घरकुलांना एकत्रित २ लाख १० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. केंद्र सरकार १.२० लाख, २८ हजार मनरेगा योजनेतून, १२ हजार स्वच्छ भारत मिशन योजनेतून दिले जाते.

राज्य सरकार ५० हजार अनुदान देते. त्यात ३५ घरकुलासाठी आणि १५ हजार सौरऊर्जेसाठी दिले जातात, असे एकूण २.१० लाख रुपयांचे अनुदान मिळते.

### बेघरांना जमिनीसह घरकुल

- राज्यातील ज्या बेघरांकडे जमीन नाही, अशांना घरकुल देण्यात येते. गायरान, गावठाणातील जागा दिली जाते. जागा उपलब्ध नसेल तर जागा खरेदीसाठी एक लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. काही लाभार्थींनी एकत्र येऊन जमीन खरेदी केली तर बहुमजली इमारत बांधता येईल, तशी परवानगी दिली जाते.
- घरकुलांना पाच ब्रास वाळू मोफत दिली जाते. केंद्र सरकारने अनुदानात वाढ करावी, अशी मागणीही राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे.
- सरकारने घरकुलांचे १६ हजार ४२६ अतिक्रमणे नियमित केली आहेत. १.१३ लाख लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आले आहे.
- पण, काही जणांनी गायरान, सरकारी जमिनीत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले आहे. घरकुलांसाठीची जागा वगळता अन्य अतिक्रमणे नियमित करणे शक्य होणार नाही, असेही गोरे म्हणाले.

# मृत्यु दाखल्यासाठी 'दोन हजाराची लाच

## डोंगरकीन्ही ग्रामपंचायत परिचर ACB च्या जाळ्यात




● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** शेतजमीनीची हिस्सेवाटणी करणे करीता आईच्या मृत्यू दाखल्याची आवश्यकता असल्याने डोंगरकिन्ही ग्रामपंचायत परीचर,चपराशी यास दोन हजार रुपयाची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार यांची आई मयत असुन तक्रारदार यांनी शेतजमीनीची हिस्सेवाटनी करणे करीता आईच्या मृत्यू दाखल्याची आवश्यकता असल्याने तक्रारदार यांनी आरोपी लोक सेवक राजेश बळीराम बाविस्कर वय 54 वर्ष, राः- डोंगरकिन्ही ता. मालेगाव जि. वाशिम, पदः- शिपाई/ परिचर ग्राम पंचायत डोंगरकिन्ही ता.मालेगाव जि. वाशिम, यांना संबंधित तक्रारदाराने मयत आईच्या मृत्यूचा दाखला मागितला असता बाविस्कर यांनी दाखला मीच तयार करून देतो परंतु त्यासाठी मला 2500/- रुपये द्यावे लागतील, पैसे दिले नाही, तर दाखला मिळणार नाही असे सांगून लाचेची मागणी केली. सदर तक्रारदार यास लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम यांचेकडे तक्रार दिली.

दिनांक 11/03/2026 रोजी तक्रारदारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचांसमक्ष आलोसे बाविस्कर यांच्याकडे पडताळणी केली असता आलोसे यांनी वरील नमूद कामा करिता तक्रारदाराकडे 2500/- रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर आरोपींची घरझडती रात्री उशिरापर्यंत प्रक्रिया सुरू होती.याप्रकरणी पोलीस स्टेशन मालेगाव, जिल्हा वाशिम येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7, 7- A प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.मालेगाव पोलिसांत कलम 7, 7- A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया ही त्याच रात्री उशिरापर्यंत करण्यात आली आहे.सदर आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल होताच अटक करण्याची तजवीज ठेवली आहे.

या कारवाईत पोलिस निरीक्षक, अल्का गायकवाड. ला.प्र.वि.वाशिम.पर्यवेक्षण अधिकारी जगदीश परदेशी, पोलिस उपअधीक्षक ला.प्र. वि. वाशिम, तपास अधिकारी बालाजी तिप्पलवाड,पोलीस निरीक्षक लाप्रवि, वाशिम, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक अल्का गायकवाड, पो हवा.विनोद मारकंडे, योगेश खोटे, पो.शि. महेश परमेश्वरे, चापोशि. नाविद शेख आदींनी ही कारवाई बापु बांगर,पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, अमरावती परिक्षेत्र, अमरावती ,सचीन्द्र शिंदे,अप्पर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली करण्यात आली आहे.

**यशस्वी सापळा कार्यवाही अहवाल**

♦ आलोसे राजेश बळीराम बाविस्कर वय 54 वर्ष, राः- डोंगरकिन्ही ता. मालेगाव जि. वाशिम, पदः- शिपाई/ परिचर ग्राम पंचायत डोंगरकिन्ही ता.मालेगाव जि. वाशिम यांची आरोपांबाबत पडताळणी कारवाई मध्ये आलोसे यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने 11/03/2026 रोजी सापळा कार्यवाही केली असता त्यादरम्यान आलोसे यांनी तडजोडअंती 2000/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारून आपल्या शर्टाचे वरच्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रादरदार यांच्या ईशाऱ्यावरून ला. प्र. वि. वाशिम च्या स्टाफ मार्फत आलोसे यांना जागीच ताब्यात घेतले.आलोसे क्रमांक 1 कडे मोबाईल फोन, आणि ₹2000/- रु इतकी लाचेची रक्कम मिळून आली. आरोपी यांचा मोबाईल तपासकामी ताब्यात घेण्यात आला असून पंचनामा कारवाई सुरु आहे.

# अवैध सावकारीवर धाड, महत्वाचे कागदपत्रे ताब्यात



● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** रिसोड तालुक्यात अवैध सावकारी व्यवहाराबाबत सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या दोन तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत सहकार व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने झडतीची कारवाई केली.


ही कारवाई जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) गितेशचंद्र साबळे यांच्या नियंत्रणाखाली पार पडली.या पथकात सहाय्यक निबंधक गजानन फाटे (रिसोड), आर. आर. सावंत (प्रशासन), एम. डी. कच्छवे (पथक प्रमुख), पी. टी. सरकटे (पथक प्रमुख), सहकार अधिकारी एस. एस. पाटील, जे. एस. सहारे, मुख्य लिपिक पी. आर. वाडेकर, सहाय्यक सहकार अधिकारी कु. आर. एन. शेख, कनिष्ठ लिपिक ए. ए. बेले, व्ही. आर. ढोबळे, ए. डी. वानखेडे तसेच पोलिस व महसूल विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध सावकारी व्यवहारांविरोधात सहकार विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या प्रकरणांबाबत जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम तसेच संबंधित तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय येथे गोपनीय स्वरूपात तक्रारी नोंदवाव्यात. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, अशी माहिती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था रिसोड यांनी दिली आहे.

♦ सहकार विभागाकडे प्राप्त तक्रारींच्या चौकशीसाठी गैरअर्जदार सचिन गणराजआप्पा गांजरे, रा. छत्रपती शिवाजी चौक, रिसोड तसेच सुधाकर किसन टेकाळे (रा. चिखली, ता. रिसोड, जि. वाशिम) यांच्या राहत्या घरी दि.६ मार्च २०२६ रोजी दोन स्वतंत्र पथकांमार्फत झडती घेण्यात आली. या झडतीदरम्यान पुढील चौकशीसाठी काही महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून सदर प्रकरणी सावकारी कायद्याअंतर्गत पुढील चौकशी सुरू आहे.

# मंगरुळपीर तालुक्यातील जनुना बु. गावाच्या अंगनवाडीतील साहित्याची अज्ञाताकडुन तोडफोड





● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

**वाशिम :** मंगरुळपीर तालुक्यातील जनुना बु. या गावामधील अंगवाडीतले अज्ञात व्यक्तीने साहित्याचे नुकसान केल्यामुळे तात्काळ चौकशी योग्य ती रित्या कार्यवाही करण्यासाठी अंगनवाडी सेविकेने दि.१२ मार्च रोजी पोलिस स्टेशनसह सर्व सबंधित विभागाला लेखी तक्रार सादर केली आहे.

अंगनवाडी सेविकेने निवेदनात नमुद केले आहे आहे की,अंगणवाडीमध्ये अज्ञात व्यक्तीने बेकायदेशीरपणे घुसून साहित्याची तोडफोड करण्यात आल्याचे दिनांक 09 मार्च 2026 रोजी सोमवारी सकाळी दिसून आले आहे. टि व्ही, शौचालयाचा दरवाजा, परसबाग इत्यादी चे अतोनात नुकसान केले आहे.सद्यस्थितीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येत असून आम्ही आमच्या अंगणवाडीमध्ये विविध उपक्रम राबवित आहे.

अंगणवाडी मधील मुलांना चांगले आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे, चांगल्या वातावरणात त्यांचे भरणपोषण व्हावे, त्यांची शारीरिक मानसिक आरोग्य संपन्न वाढ व्हावे याकरिता आम्ही भरपूर मेहनत घेत आहोत पण ही बाब करत असताना गावातील काहीं समाजकंटकाना अंगणवाडीचा विकास व्हावा, प्रगती व्हावी असे मुळीच वाटत नाही असे दिसते त्यामुळे त्यांनी असा साहित्य तोडफोडीचा प्रकार केला असल्याचे मला वाटते तरी याप्रकरणी तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी असे निवेदन मंदा प्रल्हाद पाटील अंगणवाडी सेविका जनुना बु यांनी पोलिस प्रशासनाला दिले आहे.

> **ग्रामपंचायत जनुना (बु.) यांच्या मार्फत दवंडी देऊन ज्याने कोणी अंगणवाडीच्या साहित्याची तोडफोड केली त्यांनी नुकसान भरपाई करून तो गावाची माफी मागून कबुल करेल त्याला आम्ही माफ करू अस ठरलं होतं पण कोणी कबुल केल नाही म्हणून आम्ही लेखी तक्रार देत आहे. सदर दोषीवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.**
>
> **- रुपाली नितेश खडसे,** सरपंच जनुना बु.ता.मंगरुळपीर

# बुलडाणा शासकीय महाविद्यालयाला राजमाता जिजाऊंचे नाव द्या

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केली मागणी




● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा :** 'शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला' स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी पत्र देऊन केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांचे जन्मस्थान आहे. त्यांच्या नावाने हे आरोग्य मंदिर उभे राहणे हा केवळ जिल्ह्याचाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा सुद्धा गौरव असेल.

तेव्हा बुलढाणा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला राष्ट्रमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे नाव द्यावे अश्या मागणीचे पत्र केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. मुख्यमंत्री महोदय जनभावनेचा आदर करून नक्कीच सकारात्मक विचार करतील, अशी अपेक्षा नामदार प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली आहे.

# हिंगणघाट-छ.संभाजीनगर मार्गे लोणार एकमेव बसफेरी सुरु!



● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार

**लोणार :** प्रवाशी सेवा संघटना, लोणार यांच्या मागणीनुसार जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ लोणार मार्गे हिंगणघाट आगाराची हिंगणघाट-छ. संभाजीनगर हि नवीन हिंगणघाट करीता राज्य परिवहन महामंडळाची एकमेव बसफेरी प्रवाशांच्या वारंवार होणाऱ्या मागणीनुसार प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आली आहे.

सदर बसफेरी हिंगणघाट येथुन सकाळी ०७.४५ वाजता निघुन ती वर्धा, यवतमाळ, दिग्रस, आर्णी, पुसद, अनसिंग, वाशिम, रिठद, रिसोड, भर, मोप, लोणी, लोणार, सुलतानपुर, बिबी, दुसरबीड, किंनगावराजा, सिंदखेडराजा, नाव्हा, जालना मार्गे रात्री १०.०० वाजता सिडको (छ.संभाजीनगर) येथे मुक्कामी पोहचेल दुसऱ्या दिवशी सिडको (छ.संभाजीनगर) बसस्थानक येथुन सकाळी ०८.०० वाजता हि बसफेरी हिंगणघाट करीता सुटुन ती रात्री १०.०० वाजता हिंगणघाट येथे पोहचेल लोणार, रिसोड आणि वाशिम या तिन्ही शहरातुन हिंगणघाट करीता हि बसफेरी एकमेव बसफेरी आहे.

सदर फेरी सुरू करुन प्रवाशांची प्रवासाची गैरसोय दुर केल्याबद्दल नितीन मैंद, महाव्यवस्थापक (वाहतुक) मुंबई, श्रीकांत गभणे, प्रादेशिक व्यवस्थापक, नागपुर, भगवान जगणोर, विभाग नियंत्रक, वर्धा, स्वाती तांबे मॅडम, विभागीय वाहतुक अधिकारी, वर्धा आणि गौतम शेंडे, आगार व्यवस्थापक, हिंगणघाट यांचे प्रवाशी सेवा संघटनेच्या अध्यक्ष, उस्मान शेख, सचिव, भागवत खरात आणि उपाध्यक्ष अशोक काटकर यांनी आभार व्यक्त केले असुन प्रवाशी, पर्यटक, व्यापारी, रुग्ण, भक्तगण आणि विद्यार्थी यांनी सुरू करण्यात आलेली एकमेव बसफेरीचा लाभ घ्यावा असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# यशवंतराव चव्हाण यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा, दि. 12 :** देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, सुरेश थोरात, अजिक्य गोडके, समाधान गायकवाड, तहसिलदार वृशाली केसकर यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादिववाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# गॅस सिलिंडरची अंत्ययात्रा; चुलीवर थापल्या भाकरी

## काँग्रेसच्यावतीने १२ मार्चला जिल्हाभर आंदोलन ; चिखली तहसीलमध्ये गॅस सिलिंडरची प्रतीकात्मक अंत्ययात्रा, महिला कार्यकर्त्यांनी चूल मांडून तव्यावर भाकरी थापून इंधन दरवाढीचा निषेध

● दिव्य मातृछाया
● महेंद्र हिवाळे

**बुलढाणा :** आखाती देशातील युद्धाचा फटका महाराष्ट्रालाही बसला आहे. जनता इंधनाच्या समस्यांनी त्रस्त झाली आहे. इंधन तुटवडा असतानाच गॅस सिलिंडरचे भाव केंद्र सरकारने वाढविल्याने संताप व्यक्त केला जात आहे. याला केवळ केंद्र सरकारच कारणीभूत असल्याचा आरोप करीत जिल्हा काँग्रेसच्या वतीने १२ मार्चला जिल्हाभर आंदोलन करण्यात आले. चिखली तहसीलमध्ये गॅस सिलिंडरची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली, तर महिला कार्यकर्त्यांनी चूल मांडून तव्यावर भाकरी थापून इंधन दरवाढीचा निषेध नोंदविला.

जिल्ह्यात तालुकास्तरावरदेखील काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलने करून परिसर दणाणून सोडला. तहसील कार्यालयांसमोर काँग्रेसने गॅस सिलिंडरच्या दरवाढीचा निषेध केला.

चिखली तहसीलदार निवेदन घेण्यासाठी कार्यालयाबाहेर न आल्याने पदाधिकारी आक्रमक झाले. कार्यकर्त्यांनी तहसीलदारांना घेराव घातला. केंद्र सरकारने गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ केल्याने जनतेत रोष निर्माण झाला आहे. केंद्रात सत्तेत आल्यापासून सरकारने आजवर किमान ५० वेळा गॅस सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. काँग्रेसच्या काळात ४०० रुपयांवर असलेला गॅस सिलिंडर आता ९०० रुपयांवर पोहोचला आहे. तसेच व्यावसायिक सिलिंडरही गेल्या आठवडाभरात १५० रुपयांनी महाग झाल्याने त्याची किंमतही १ हजार ९०० च्या जवळपास पोहोचली आहे. एकीकडे महिलांना लाडकी बहीण म्हणायचे आणि दुसरीकडे महिला दिनाच्या एक दिवस आधी दरवाढ लादून दरवाढीची भेट देण्याचा सरकारचा दुपट्टीपणा समोर आला आहे.

आंदोलनात रामभाऊ जाधव, अतहरोद्दीन काझी, अंबादास वाघमारे, शहराध्यक्ष जाकीर शेख, संगीता गाडेकर, विद्या देशमाने, खलील बागवान, अशोक पडघान, पांडुरंग भुतेकर, खलील बागवान, अशोक पडघान, पांडुरंग भुतेकर, आत्माराम देशमाने, वर्धमान डहाळे, श्याम पठाडे, समाधान आकाळ, सुनीता शिंगणे, शीतल देशमुख, सुप्रिया भटकर, स्वाती लहाने, सीमा देव्हडे, वहिदा बेगम, गोपाल देव्हडे, गोकुळ शिंगणे, आनंद बोंद्रे, संतोष देशमुख, आनंद बोंद्रे, प्रमिला जाधव, शालीनी वानखेडे, अनिता घुगे, प्रदीप पचेरवाल, सिद्धेश्वर परिहार, अंबादास खरात, विजय जागृत, प्रकाश सपकाळ, डॉ. रवींद्र कमळस्कर, भास्कर चांदोरे, दिगंबर देशमाने, शेख खैरू, अकील खान, दत्ता करवंदे, सुनील पवार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




♦ गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या घरातील बजेट कोलमडले असून लाडक्या बहिणींवर चूल पेटवण्याची वेळ आली आहे, हेच का केंद्र सरकारचे अच्छे दिन? असा संतप्त सवाल काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी चिखली येथील आंदोलनादरम्यान केला. अमेरिका ठरवेल ते आपल्या देशाचे धोरण झाले आहे. त्यामुळेच युद्धाच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ करण्यात आली आहे. या युद्धाचा अंदाज आलेला असतानाही सरकारला नियोजन करता आले नाही, यावरून या सरकारची धोरणे कशी तकलादू आहेत, हेच स्पष्ट झाल्याचे बोंद्रे म्हणाले.

# ऐतिहासिक वारसा जपणार; पर्यटनमंत्र्यांची ना. प्रतापराव जाधवांनी घेतली भेट

## लोणार सरोवर, जिजाऊ जन्मस्थळाला शेखावत देणार भेट

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**बुलढाणा :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकाराने लवकरच जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळांचा विकास होणार आहे. जिल्ह्यातील अनमोल ठेवा असलेले लोणार सरोवर, राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थळ आणि विविध ऐतिहासिक स्थळांच्या विकासाच्या दृष्टीने केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना जिल्ह्याचे महत्त्व सांगून बुलढाणा जिल्ह्यात येण्याचे निमंत्रण ना. जाधव यांनी दिले आहे.

खाऱ्या पाण्याचे जगप्रसिद्ध लोणार सरोवर आणि राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्मस्थान सिंदखेड राजा येथे भेट देऊन पुरातत्व विभागाची बैठक बुलढाणा जिल्ह्यात घ्यावी, अशी विनंती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना आज दिल्ली येथे प्रत्यक्ष भेटीत केली. पर्यटनमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवित बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्याचे निमंत्रण स्वीकारले.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे आहे. राजे लखुजीराव जाधव यांचा राजवाडा व इतरही ऐतिहासिक वास्तू येथे अस्तित्वात आहेत. उत्खननादरम्यान भगवान विष्णूची मूर्ती तेथे मिळाली. धार्मिक भावनांचा आदर करीत या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून मंदिर बनविणे गरजेचे आहे. शिवाय या परिसरामध्ये ऐतिहासिक वस्तूच्या निर्माण व ऐतिहासिक वारसा टिकून ठेवण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. पर्यटन विभागाच्या माध्यमातून यासाठी निधी द्यावा.

जगप्रसिद्ध लोणार सरोवर आणि ऐतिहासिक राजमाता जिजाऊ जन्मस्थळ हे दोन्हीही स्थळ पर्यटन विभागाअंतर्गत येत असल्याने येथील विविध समस्यांचे निवारण करण्याच्या दृष्टिकोनातून आपण प्रत्यक्ष या स्थळांना भेटी देऊन येथेच विकासात्मक बाबीवर चर्चा करून बैठक घ्यावी, अशी विनंती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज दिल्ली येथे गजेंद्रसिंह शेखावत यांची भेट घेऊन केली.

बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येऊन या दोन्ही स्थळांना भेटी देण्याचे निमंत्रण दिले. त्यांनी सकारात्मकता दर्शवित हे निमंत्रण स्वीकारले. पुरातत्व विभागाचे नियमांची शिथिल करण्याची मागणी. यावेळी श्रद्धाळूच्या कुंड जल स्नान विषयावरही चर्चा केली. पूर्वी या परिसरातील जलकुंडामध्ये श्रद्धाळूंना स्नान करण्याची आणि धारातीर्थ गोमुखातून कावड यात्रेसाठी पाणी घेऊन जाण्याची मुभा होती. परंतु कोविड काळामध्ये हे क्षेत्र प्रतिबंधित करण्यात आले होते. कोविडचा काळ संपुष्टात आल्यानंतर प्रतिबंधक नियम मागे घेण्यात आली नाही. हे नियम शिथिल करण्यासंदर्भात पुरातत्व विभागाला सूचना करण्याची विनंती ना. जाधव यांनी केली.



♦ बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथे उल्कापातामुळे निर्माण झालेले जागतिक दर्जाचे सरोवर आहे. या सरोवराला नुकताच रामसर सरोवराचा दर्जाही मिळाला आहे. लोणार सरोवरातील पाण्याची पातळी वाढत चालली आहे. त्यामुळे परिसरात असलेली पुरातन मंदिरे जलमय झाली आहेत.

♦ ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठेव जतन हा चिंतेचा विषय ठरला आहे. या विषयी तज्ज्ञांना पाचारण करून संशोधन होणे गरजेचे आहे, असे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी पर्यटनमंत्र्यांशी चर्चा करताना सांगितले.

# सिंदखेडराजामध्ये गॅसच्या अभावी नागरिक त्रस्त

● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा :** शहरात मागील काही दिवसांपासून घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवत असून त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक गॅस एजन्सीकडे सिलेंडर उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत.

वेळेवर बुकिंग करूनही अनेकांना गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. काही ठिकाणी दोन-तीन दिवस वाट पाहूनही सिलेंडर मिळत नसल्याने महिलांची विशेष गैरसोय होत आहे.

घरगुती स्वयंपाकासाठी गॅसवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना पर्याय नसल्यामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. काही नागरिकांनी गॅस एजन्सीकडे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता योग्य प्रतिसाद मिळत नसल्याचेही सांगितले जात आहे.

शहरातील विविध भागातील नागरिकांनी प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी आणि गॅस एजन्सींनी नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सिंदखेडराजा शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर गॅस पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक असल्याचेही नागरिकांनी नमूद केले आहे.



# शेतकरी ओळखपत्र' तील त्रुटी दूर केल्या जातील -कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** बीड जिल्ह्यातील शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) नोंदणी प्रक्रियेत काही तांत्रिक त्रुटी आढळून आलेल्या आहेत. त्याची दखल घेऊन त्या दुरुस्त करण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल. एका महिन्याच्या आत आवश्यक त्या सुधारणा या शेतकरी ओळखपत्रात करण्यात येतील, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत दिली.

देशातील कृषी क्षेत्राचे डिजिटलायझेशनचा एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतकरी ओळखपत्र देण्यात आले आहे. या ओळखपत्राचा शासनाच्या अनेक योजनांसाठी उपयोग होत आहे. या ओळखपत्रात अनेक तांत्रिक अडचणी आढळून आलेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीचे कमी जास्त क्षेत्रफळ नमूद करण्यात आले आहे. जमिन नोंदणीचा आदलाबदल झाली आहे. या त्रुटीमुळे शेतकऱ्यांच्यात संताप पसरला आहे. अशी लक्षवेधी सदस्य विजयसिंह पंडित यांनी लक्षवेधी मांडली.

देशात ॲग्रीस्टॅक या प्रणालीच्या अंमलबजावणीपूर्वी प्रायोगिक तत्त्वावर सहा जिल्ह्यांची निवड करण्यात आली होती, त्यामध्ये बीड जिल्ह्याचा समावेश होता.



# एलपिजी गॅस दरवाढ आणी मका खरेदी करुन पैसे तात्काळ द्या

## मोताळा तालुका काँग्रेसकडून तहसीलदारांना निवेदन




● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मोताळा :** मोताळा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने एलपीजी गॅसच्या वाढत्या किमती व सरकारी मका खरेदी केंद्राबाबत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचे जीवन आधीच कठीण झाले असताना गॅसच्या दरवाढीमुळे जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गॅस सिलेंडरच्या किमती सातत्याने वाढत असून एका सिलेंडरसाठी ९०० रुपयांपेक्षा जास्त पैसे मोजावे लागत आहेत. तसेच व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे हॉटेल, खानावळ व लहान व्यावसायिकांवर त्याचा परिणाम होत असून सर्वसामान्य नागरिकांनाही त्याचा फटका बसत आहे. त्यामुळे सरकारने वाढलेल्या गॅसच्या किमती तात्काळ कमी कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

या निवेदनावर मोताळा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रवीण (आप्पा) अर्जुन कदम, किसान तालुका सेलचे अध्यक्ष नितीराजसिंह राजपूत व शहराध्यक्ष नितीनभाऊ इंगळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

यावेळी कृष्णाभाऊ खराटे (तालुका कार्याध्यक्ष), तुळशीराम नाईक (जिल्हा उपाध्यक्ष), गणेश पाटील (ज्येष्ठ नेते), उखाभाऊ चव्हाण (माजी सभापती), मिलिंद जैस्वाल (जिल्हा सचिव), साहेबराव डोंगरे (जिल्हा नेते), प्रकाश बस्सी (माजी पंचायत समिती सभापती), राजेंद्र वाघ, अक्षय ठाकूर (युवक नेते), सोनू कुळे (युवक नेते), खालिद कुरेशी, कैलास पाटील, बाळू पाटील, नईम बागवान, फिरोज पटेल व विकास उजाडे आदी उपस्थित होते.

♦ सरकारी खरेदी केंद्रामध्ये मका विक्री केलेल्या शेतकऱ्यांचे पैसे दोन महिन्यांहून अधिक काळ उलटूनही मिळाले नसल्याची तक्रार निवेदनात करण्यात आली आहे. अनेक शेतकऱ्यांकडे अजूनही मका विक्री बाकी असून सरकारी खरेदी केंद्र बंद असल्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रलंबित पैसे तात्काळ द्यावेत तसेच सरकारी मका खरेदी केंद्र पुन्हा सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

# जिजाऊ इंटरनॅशनल स्कुल दुसरबीड येथे जागतिक महिला दिन विशेष कार्यक्रम उत्साहात साजरा

● दिव्य मातृछाया
● गुलशेर शेख

**दुसरबीड :** जिजाऊ इंटरनॅशनल स्कुल दुसरबीड येथे जागतिक महिला दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या संचालिका डॉ. शिल्पाताई कायंदे मॅडम, डॉ. जयश्रीताई सानप, सौ. छायाताई बगाडिया माजी सरपंच बीबी, सौ. सुजाताताई खंदारे, सौ. होळकर मॅडम ग्रामसेविका, या उपस्थित होत्या.

तसेच कार्यक्रमाची सुरुवात ही माता सरस्वती, माता जिजाऊ, माता रमाई, क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वन करून करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांनी महिला दिनानिमित्त आपल्या भाषणातून महिला सशक्तीकरणासाठी मार्गदर्शन केले. तसेच डॉ. शिल्पाताई कायंदे मॅडम यांनी आपल्या शाळेत मुलीसाठी विशेष कार्यक्रम व मुलींना स्वावलंबी करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून यावेळी कार्यक्रमाचे महत्त्व सांगता महिलांना खंबीर व प्रभावी नेतृत्व करावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे म्हटले.

तसेच सर्व महिला पालकांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम व विविध प्रतियोगिता क्रीडा स्पर्धा करण्यात आल्या होत्या. स्पर्धेतून सर्व महिला पालकांनी मनोरंजनात्मक खेळ खेळत आनंद घेतला. तर स्पर्धेत विजयी झालेल्या महिला पालकांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेचे मुख्याध्यापक श्री. पि एस खार्डे यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# नगर परिषद शाळेसाठी 1 कोटी 70 लाख रुपयाचा निधी

**संजय रायमुलकर यांचे प्रयत्न : शिक्षण सभापती डॉ. सौ. दीपिकाताई राहाटे यांचा पुढाकार नगरपरिषद मराठी शाळा क्रमांक एक व उर्दू शाळा क्रमांक पाच साठी नवीन बांधकाम होणार**

● **दिव्य मातृछाया**
● **वृत्त संकलन**





**मेहकर :** नगरपरिषद अंतर्गत असलेल्या मेहकर शहरातील अनेक शाळा अतिशय जुन्या झाल्या आहेत काही इमारती जीर्ण झाले आहेत त्यामुळे नगर परिषदेच्या शिक्षण सभापती डॉ. सौ. दीपिकाताई रविराज रहाटे यांनी शिक्षण सभापती होताच नगर परिषदेच्या शाळेचा दर्जा सुधारला पाहिजेत प्रत्येक शाळेला नवीन इमारत असली पाहिजेत विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजेत यासाठी पुढाकार घेतला असून माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या अथक परिश्रमाच्या माध्यमातून नगरपरिषद मराठी शाळा क्रमांक एक व उर्दू शाळा क्रमांक पाच साठी लवकरच नवीन इमारतीचे बांधकाम सुरू होणार आहे.

♦ यावेळी शिक्षण सभापती डॉ. सौ. दीपिका ताई राहाटे यांनी सांगितले की नगरपरिषदेच्या मेहकर शहरात असलेल्या मराठी व उर्दू शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी आम्ही 100% प्रयत्न करू शाळेमध्ये विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजेत ज्या शाळा जीर्ण झाले आहेत त्या शाळेसाठी नवीन इमारत, शाळेमध्ये शुद्ध पाणी यासह इतरही सुविधा विद्यार्थ्यांना देण्यात येतील केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच मेहकर शहरातील सर्वच शाळा सुसज्ज करण्यासाठी आम्ही सर्व सदैव प्रयत्न करू.

12 मार्च रोजी माजी आमदार संजय रायमुलकर शिक्षण सभापती डॉ.सौ. दीपिकाताई रविराज रहाटे, नगरसेविका अक्काताई गायकवाड महिला व बालकल्याण सभापती काबराताई यांच्यासह इतरांनी मराठी शाळा क्रमांक एक व उर्दू शाळा क्रमांक पाच या ठिकाणी भेट दिली व पाहणी केली.

यावेळी या कार्यक्रमाला वैशाली सावजी शिवसेना महिला आघाडी शहराधक्ष्या मनोज जाधव विशाल काबरा भूषण घोडे धनंजय गायकवाड प्रदीप बुंधे हर्षल गायकवाड भूषण गारोळे रवी जुनघरे घनशाम गायकवाड अन्य उपस्थित होते यावेळी सर्व मान्यवरांचा मराठी शाळा क्रमांक एक व उर्दू शाळा क्रमांक पाचच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# उन्हाची चाहूल लागताच मलकापूर पांग्रा आठवडी बाजारात "गरिबांचा फ्रिज" माठाला मोठी मागणी



● **दिव्य मातृछाया**
● **वसीम शेख**

**मलकापूर पांग्रा :** उन्हाळ्याची चाहूल लागताच ग्रामीण भागात पारंपरिक थंड पाण्याचा स्रोत असलेला माठ पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. गुरुवारी भरत असलेल्या मलकापूर पांग्रा येथील प्रसिद्ध आठवडी बाजारात यंदा "गरिबांचा फ्रिज" म्हणून ओळखला जाणारा माठ विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात दाखल झाला आहे. बाजारात माठ खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच तापमानात वाढ होऊ लागल्याने थंड पाण्यासाठी माठाची मागणी वाढत आहे. गावोगावी घरात नैसर्गिक थंड पाणी मिळावे यासाठी नागरिक माठ खरेदीला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे मलकापूर पांग्रा येथील गुरुवारच्या आठवडी बाजारात माठ विक्रेत्यांची चांगलीच लगबग दिसून आली.

सध्या बाजारात माठाची किंमत साधारणतः २०० ते २२० रुपयांच्या दरम्यान आहे. माठाच्या आकारानुसार व गुणवत्तेनुसार किंमतीत थोडाफार फरक आढळून येत आहे. उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने येत्या काही दिवसांत माठांच्या मागणीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, उन्हाची तीव्रता अधिक वाढल्यास माठाच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अनेक नागरिकांनी आधीच माठ खरेदी करण्याकडे कल दर्शवला असून बाजारात खरेदीसाठी चांगलीच गर्दी पाहायला मिळत आहे.

# शेतातून 9 क्विंटल डॉलर हरभरा चोरी

**अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल ! मनुबाई शिवारातील घटना ; 72 हजारांचा मुद्देमाल लंपास**

● **दिव्य मातृछाया**
● **वृत्त संकलन**



**चिखली :** तालुक्यातील अंढेरा पोलीस ठाणे हद्दीत शेतातून डॉलर हरभऱ्याचे कट्टे चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी शेतात ठेवलेले डॉलर हरभऱ्याचे 18 कट्टे चोरी करून नेल्याने सुमारे 72 हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी अंढेरा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

♦ चोरी गेलेल्या हरभऱ्याचे वजन अंदाजे 9 क्विंटल असून त्याची किंमत सुमारे 72 हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर परिसरातील शेतकरी व नागरिकांकडे विचारपूस केली असता कोणालाही याबाबत माहिती नसल्याचे सांगण्यात आले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अनिल केशव मापारी (वय 52, रा. मेरा बु., ता. चिखली, जि. बुलढाणा) हे शेती व्यवसाय करतात. त्यांच्या मालकीची जमीन मनुबाई शिवारातील गट क्रमांक 371 मध्ये असून त्यांनी यावर्षी त्या शेतात गहू, हरभरा व इतर पिकांची लागवड केली होती.

दि. 11 मार्च 2026 रोजी दुपारी सुमारे 4 वाजण्याच्या सुमारास मळणी यंत्राच्या साहाय्याने शेतातील डॉलर हरभऱ्याची मळणी करण्यात आली. मळणीनंतर हरभरा 21 कट्ट्यांमध्ये भरून शेतातच ठेवण्यात आला होता. त्यानंतर रात्री सुमारे 11 वाजता मापारी हे घरी परतले.

मात्र 12 मार्च रोजी सकाळी सुमारे 6 वाजता गुरांना चारापाणी करण्यासाठी ते शेतात गेले असता हरभऱ्याच्या खळ्यावर ठेवलेल्या कट्ट्यांपैकी फक्त 3 कट्टे शिल्लक दिसले, तर उर्वरित कट्टे तेथून गायब असल्याचे आढळले. अज्ञात चोरट्यांनी रात्री 11 ते सकाळी 6 वाजण्याच्या दरम्यान 18 कट्टे डॉलर हरभरा चोरी करून नेल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी तक्रारदार अनिल मापारी यांनी अंढेरा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता 2023 च्या कलम 303(2) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल भारत जगन्नाथ पोफळे करीत आहेत.

# लोणार सरोवर प्रकरणी आ. सिद्धार्थ खरात आक्रमक

● **दिव्य मातृछाया**
● **वृत्त संकलन**




**विधानसभेत सरकारला धरले धारेवर**

**मेहकर दि .12 मार्च :** जागतिक वारसा स्थळ असलेल्या लोणार सरोवराची पाणी पातळी सातत्याने वाढत असल्याने परिसरातील प्राचीन मंदिरे पाण्याखाली जात आहेत. या गंभीर विषयावर शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडत सरकारचे लक्ष वेधले.

प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे आणि वन विभागाच्या परवानग्या रखडल्यामुळे या ऐतिहासिक वारशाचे नुकसान होत असल्याचा घणाघाती आरोप त्यांनी यावेळी केला.

## मंदिरांतील मूर्तींच्या नाकापर्यंत पाणी

♦ आमदार सिद्धार्थ खरात यांनी सभागृहात सांगितले की, "५२ हजार वर्षांपूर्वी उल्कापातामुळे तयार झालेल्या या सरोवराला जागतिक दर्जा आहे. मात्र, गेल्या २-४ वर्षांपासून पाणी पातळी प्रचंड वाढली आहे. यामुळे १२ ते १५ मंदिरे बाधित झाली असून, ६ मंदिरे पूर्णतः पाण्याखाली गेली आहेत. प्रसिद्ध कमलजा माता मंदिरातील मूर्तींच्या नाकापर्यंत पाणी आले आहे. पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नियुक्त समितीने एकदाही सरोवराची पाहणी केलेली नाही, ही दुर्दैवी बाब आहे."

### ४१ लाखांचा निधी मंजूर, तरीही काम ठप्प

सरोवरातील वाढीव पाणी उपसा करण्यासाठी आणि गोमुख-गायमुखाचे पाणी वळवण्यासाठी ४१ लाख रुपयांची प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. मात्र, वन्यजीव विभाग आणि पुरातत्व विभाग यांच्यात समन्वय नसल्याने कामाला सुरुवात झालेली नाही. "वन्यजीव विभाग दाद देत नाही आणि लोकप्रतिनिधींना जुमानत नाही," अशा शब्दांत आ. सिद्धार्थ खरात यांनी संताप व्यक्त केला.

### विकास आराखड्यात सुविधांचा अभाव

लोणार शहराच्या विकास आराखड्यावर बोलताना त्यांनी सांगितले की, पर्यटकांच्या सोयीसाठी शहरात उद्यान, पॅराग्लायडिंग, तारांगण, मोठा टेलिस्कोप, रोपवे आणि चांगले रस्ते यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. या आराखड्यात तत्काळ सुधारणा करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

### सरकारचे आश्वासन: उद्याच तातडीची बैठक

आमदार सिद्धार्थ खरात यांच्या आक्रमक भूमिकेनंतर वनमंत्री गणेश नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांशी चर्चा झाली असून, वन विभागाची परवानगी मिळवण्यासाठी उद्याच (शुक्रवारी) तातडीची बैठक बोलावण्यात आली आहे. तसेच, लोणारच्या विकासासाठी मंजूर ४३४ कोटींपैकी १७४ कोटींचा निधी प्राप्त झाला असून, त्यातील १८० कोटी रुपये सरोवराचे पावित्र्य जपण्यासाठी खर्च केले जाणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

# राज्यातील बिबट्यांना अन्य राज्यात मागणी का वाढत आहे?

● **दिव्य मातृछाया**
● **वृत्त संकलन**

**मुंबई :** राज्यात अनेक ठिकाणी मानवी वस्तीत येणारे आणि मनुष्य हाणीस कारणीभूत ठरणाऱ्या बिबट्यांना गुजरातमधील वनतारा पुनर्वनस केंद्राप्रमाणेच अन्य राज्यात पाठवणी करण्यात येणार आहे.

तसेच बिबट्यांना शेड्यूल एक मधून दोनमध्ये टाकण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे आता बिबट्यांची अन्य राज्यात किंवा पुनर्वसन केंद्रात पाठवणी करण्यासाठी केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागणार नाही अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.



सांगली जिल्ह्यातील चांदोली अभयारण्यालगतच्या शिराळा-वाळवा परिसरात बिबट्यांच्या वाढत्या हालचालीमुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढत आहे. याबाबत सत्यजित देशमुख, गोपिचंद पडळकर यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या चर्चेत नाईक बोलत होते.

# मेहकर पंचायत समिती अंतर्गत घरकुलाच्या ५.८८ कोटी रुपयांचा निधी अद्याप लाभार्थ्यांच्या खात्यात नाही

● **दिव्य मातृछाया**
● **वृत्त संकलन**



**मेहकर, दि. १२ मार्च :** मेहकर पंचायत समिती अंतर्गत गरिबांच्या घरकुल बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या ५ कोटी ८८ लाख ७० हजार रुपयांचा निधी अद्याप लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेला नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. हा निधी SNA स्पर्श प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात पाठवण्यात आल्याची माहिती असली तरी संबंधित प्रणाली अत्यंत संथ गतीने काम करत असल्यामुळे आजपर्यंत एकही रुपया अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही.

यामुळे अनेक गरीब कुटुंबांची घरकुले उंबरठा अवस्थेत किंवा अंतिम टप्प्यात असूनही पैशाअभावी बांधकाम पूर्ण होऊ शकलेले नाही. परिणामी लाभार्थ्यांना नव्या घरात राहायला जाण्यास विलंब होत आहे.

या संदर्भात बुलडाणा जिल्हा भा.रा. काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, स्पर्श प्रणालीमुळे निधी वितरणात अडथळे निर्माण होत असल्याने शासनाने या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच गरज भासल्यास हा निधी जुन्या प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची माहिती आणि पुढील कार्यवाहीसाठी अर्थ सचिव, विभागीय आयुक्त अमरावती, जिल्हाधिकारी बुलडाणा तसेच जिल्हा परिषद बुलडाणा यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही प्रत पाठवण्यात आली आहे.

गरीबांच्या घरकुलाचा प्रश्न तातडीचा असल्यामुळे शासनाने याकडे गंभीरतेने लक्ष देऊन त्वरित निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


# दिव्यांग लाभार्थ्यांनी UDID कार्ड सादर करावे; अन्यथा लाभ खंडित होतील - तहसीलदार अजित दिवटे!

**संजय गांधी योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्यांना सूचना ; DBT पोर्टलला लिंक करणेही बंधनकारक**

● **दिव्य मातृछाया**
● **सुरेश हुसे**

**सिंदखेडराजा :** तहसील कार्यालय सिंदखेडराजा अंतर्गत संजय गांधी, निराधार योजनेचा लाभ घेत असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले UDID Card (यूडीआयडी कार्ड) तातडीने तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागात सादर करावे, अन्यथा संबंधित लाभ वितरण खंडित केले जाईल, असा इशारा तहसीलदार अजित दिवटे यांनी दिला आहे.

तहसील कार्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, संजय गांधी योजनेअंतर्गत लाभ घेणारे तसेच नव्याने लाभ घेऊ इच्छिणारे सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी UDID कार्ड सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासोबतच हे कार्ड DBT Portal (डीबीटी पोर्टल) ला जोडणेही बंधनकारक करण्यात आले आहे. दरम्यान, निर्धारित कालावधीत UDID कार्ड सादर न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचे योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान थांबविण्यात येऊ शकते. त्यामुळे सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी या सूचनेची गांभीर्याने दखल घ्यावी, असे आवाहन तहसीलदार अजित दिवटे तसेच निवासी नायब तहसीलदार प्रांजल पवार (संजय गांधी योजना) यांनी केले आहे.



♦ यामुळे शासनाच्या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पारदर्शक पद्धतीने पोहोचविणे सुलभ होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी विलंब न करता तहसील कार्यालय, सिंदखेडराजा येथील संजय गांधी विभागाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.